# संगीत उःशाप

**लेखक**
हिंदुहृदयसम्राट स्वातंत्र्यवीर
**विनायक दामोदर सावरकर**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

---

प्रमुख वितरक
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**संगीत अु:शाप : विनायक दामोदर सावरकर**

**© हिमानी सावरकर**

**जनआवृत्ती संकल्पना : श्री. नानासाहेब गोडसे**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**दुसरी आवृत्ती**
मे, २०१२ - २००० प्रती

**किंमत**
जनआवृत्ती रुपये १००/-

# संगीत अु:शाप

# संगीत अु:शाप

## अंक पहिला

### प्रवेश १ ला

(सूत्रधार, नटी, पारिपार्श्वक उभे आहेत.)

(**नांदी** – पद)

**देअि अु:शाप हा, हिंदु जातिसी पहा।। हे पतितपावना,**
**अमित अपराध, परि स्मर कुल–गुरु–तप महा।।ध्रु।।**
**पय यशोदे तुझें, पयहि यमुने तुझें, स्वकुल लोभ स्मरवुत,**
**रिझवुत यदुप हरि हा।।१।।**

**पद २ रें**

**आजवरि आचरि जो चरिताला ।।ध्रु।। नाट्यविषय जें अद्‌भुत व्हावें।।**
**अन्य सु–कविजनाला।।१।। अन्य चरित्रा नाट्यीं रचिता।**
**आजि विनायक झाला।।२।।**

**सत्यप्रिय–** (पडद्यातून) थांबा! थांबा!

**सूत्रधार–** अरे, मंगलाचरण संपतं न संपतं तोंच आम्हांला, थांबा, थांबा म्हणून आज्ञा सोडीत हा अिकडे कोण येत आहे?

**नटी–** नाथ! विनायकाचं नाव अैकताच हा कुणी तरी अधिकारी नाटक बंद करण्याकिरता अिकडें येतो आहे की काय, असा मला धाक वाटतो. ही नाट्यकृति विनायकाची आहे, असं आपण कशाला बरं सांगितलंत? आक्षेपाच्या प्रबल शापाचे वज्राघाताखाली विनायकाच्या लेखणीची देवकीच्या देववंद्य कुसव्यासारखी

करुणास्पद स्थिति झालेली आहे. देवकीचीं देदीप्यमान अपत्यं, जशीं अुपजताच मृत्यूच्या जबड्याचे थडग्यात पुरून टाकिलीं जात, तशीच त्या लेखणीच्या अपत्यांची स्थिति आजवर झाली असून, योगायोग अेखाद्या काळ पुरुषाप्रमाणे त्यांस अुपजताच विस्मृतीच्या अतल पातालात ढकलून देत आलेला आहे.

**सत्यप्रिय–** (पडद्यातून) थांबा! थांबा!

**पारिपार्श्वक–** अरे बापरे! सरकारी अधिकारीच हा! आता कुठं जाअू? अरे सूत्रधारा! अनुभवी, सुप्रतिष्ठित आणि प्रतिभावान् असे अितर नाट्याचार्य सोडून, या नवशिक्यां नाटककाराशी गाठ घालण्याची ही आत्मघातकी दुर्बुद्धि तुला आठवली तरी कशी? अहो सूत्रधार! आपल्या हातातील हें नाटकाचं सूत्रच नव्हे तर या आपल्या नटव्या अर्धांगीच्या गळ्यातलं तें मंगलसूत्रही आज सत्ताधिकाऱ्यांच्या त्या क्रूद्ध कात्रीत गवसलं आहे.

**सूत्रधार–** घाबरू नकोस! माझं मंगलाचरण म्हणजे सर्व शापांचा मूर्तिमंत अु:शाप आहे. त्या अु:शापाच्या मंगलाचरणानं संतुष्ट होअून तो दयामय भगवान्, पूर्वी अेकदा विनायकाच्या लेखणीवर झालेल्या शापाला अगस्तिमंत्रानं दीन करून टाकिलेल्या सापाप्रमाणं निरुप्रदवी करून टाकील.

**सत्यप्रिय–** (पडद्यात) थांबा! थांबा! (प्रवेश करून) कोण हो? गृहस्थांनो! तुम्हीच का नाटक करायला सिद्ध झाला आहात?

**पार्श्वचर–** नव्हे, नव्हे, मी नव्हे. हा आणि ही. मी केवळ निरीक्षक म्हणून येत होतो.

**सत्यप्रिय–** निरीक्षक म्हणून? नाटक करणं जर अपराध असले, तर तें आवडीनं पाहणं म्हणजे अपराधाला प्रोत्साहन देणं नव्हे कां?

**पार्श्वचर–** सरकार! मी पाया पडतो. मी जातो. सरकारी अधिकाऱ्यांचा सन्मान करण्यासाठी मी त्यांच्यापुढं नेहमीच थरथर कापत असतो.

**सत्यप्रिय–** परंतु मी सरकारही नाही किंवा सरकारी अधिकारीही नाही. किंवा त्या लोकोपयुक्त संस्थेशी तत्त्वत: माझं वैरहि नाही. तेव्हा आपण मला भिअू नका.

**पार्श्वचर–** (अुठून) सरकारी अधिकारी नाहीसना? तर मग तू कोणीही अैस. प्रत्यक्ष देव कां असेनास, तुला मी भीत नाही. भलत्या सलत्याला भिण्यअितका मी काही भेकड नाही, समजलास? बोल. तू काय म्हणून आमच्या रंगाचा बेरंग केलास?



**सूत्रधार–** (पार्श्वचरास दाबीत) अहो! मी या नाटकाचा सूत्रधार आहे. आपणही या माझ्या नाट्यप्रयोगाला अवलोकन करून अुपकृत कराल का? मला आपलं नामाभिधान कळेल का?

**सत्यप्रिय–** माझं नांव सत्यप्रिय. पूर्वी चोखामेळ्याचे काळात सत्यवान् म्हणून एक प्रख्यात धर्मप्रवर्तक होअून गेले, त्यांच्या पंथाचा मी अनुयायी आहे. त्या आमच्या गुरूंनी, ‘सत्य हाच धर्म होय!’ असा सिद्धान्त स्थापित केला. सत्य हाच आमचा वेद. अेतदर्थ आमच्या पंथाला सत्यवेदी असं संबोधितात. लोक अुपहासानं आम्हाला सत्वेडे असंही म्हणतात.

**सूत्रधार–** वा! तर मग आमच्या नाट्यप्रयोगाला आपल्यासारखा सत्यप्रिय निरीक्षक लाभावा, हें भाग्यच म्हणायचं. आपले गुरु सत्यवान्, संत चोखामेळा यांच्या समकालीन असल्यानं त्या संतांच्याच कथानकाला अभिनीत करण्यासाठी मुख्यत: रचल्या गेलेल्या या नाटकात आपणांस आपले गुरु सत्यवान यांच्याही दर्शनाचा लाभ होणार आहे.

**सत्यप्रिय–** भलतंच! अहो! मद्यपानाची चटक लावण्यास जशी विपत्ति वा आपत्ति, विषयाची चटक लावायला जशी सुंदरता, संसाराची चटक लावायला जशी माया, तशीच लोकांना असत्याची चटक लावायला ही नाट्यकला कारण झालेली आहे. मी तिचं निरीक्षण करायला नव्हे तर तिचं निर्दालन करायला आलो आहे.

**सूत्रधार–** पण हें काही राजकीय वा शृंगारिक नाटक नाही. संतविषयक नाटकं देखील सत्याच्या जीवनाला कशीं घातक होतात हें आपणांसच ठाअूक!

**सत्यप्रिय–** नाट्यविषयक कथानक राजकीय आहे किंवा नाही, यावर नाटकाची घातकता अवलंबून नाही. कथानक नव्हे, तर नाट्यकलाच वेश्येसारखी स्वरूपत:च असत्याची खाण आहे. आपलं मूळ स्वरूप झाकून, आपण दुसरे कोणीतरी आहो असं भासविण्याचा आटोकाट प्रयत्न करणं, म्हणजे केवळ ठकबाजी नव्हे का? त्यातही नुसतं स्वरूपांतरच नव्हे, तर लिंगांतरही झालं असल्याचं भासवायचं! भासवायचंच नव्हे! तर आपण तीच व्यक्ति आहोत म्हणून शपथेवर सांगायचं आणि ती व्यक्ति होअून रहायचं! कारण अुत्तम नट तोच की जो आपल्या भूमिकेशी त्या काळपावेतो तादात्म्य करू शकेल. स्वत:स पूर्णपणे विसरून जाअील– जिवंतपणी दहादा अितकं ठार मारून दाखवायचं की प्रेक्षकाना रडू कोसळावं. दिवसा

पुरुष आणि रात्री स्त्री, अितकं यथातथ्य होअून दाखवायचं कीं भूमिकाधारी खरोखर पुरुष आहे कीं स्त्री, हें हजारों जणांना निश्चितपणे त्या व्यक्तीच्या जन्मभर सांगता येअू नये. भर काळोख्या रात्री शपथेवर सांगायचं की भर अुन्हात माझे पाय पोळत आहेत. आणि अेखादं बोट खुपसल्यासही फाटून जाअील अशा पडद्याला अेक अभेद्य किल्ला समजून, त्यावर तोफा डागण्याला आज्ञा द्यायची. या अत्यंत गर्हणीय असत्याचरणाची लोकांना लाज तरी कशी वाटत नाही? माझ्या हाती जर सत्ता असती तर मी त्या सर्व नटांना कडक शिक्षाच दिली असती.

**पार्श्वचर–** (स्वगत) पुन: शिक्षा! मला अजून वाटतं की हा छद्मवेश धारण केलेला कोणी अधिकारीच असावा म्हणून त्याच्याही वतीचे दोन शब्द बोलून टाकावे. वेळच पडली तर याच दोन शब्दी बोलाच्या अरुंद बोळातून पळवाट काढून य:पलाय करायला सोपं जाअील. (अुघड) अहो सत्यप्रिय, तुम्ही शिक्षेचं नांव काढण्याच्या आधीच मी तुम्हाला सांगणार होतो की मला तुमच्या बोलण्यात बरंच तथ्य दिसतं आहे. अहो, खर्ड्याच्या लढाअीची गोष्ट घ्या. खर्ड्याच्या लढाअीत औरंगजेबाच्या हस्ते सदाशिवराव भाअू मारले गेले, हें अितिहासज्ञांना विदित आहेच. त्या सदाशिवराव भाअूंच्या मृत्यूनंतर मीच तो सदाशिवराव भाअू म्हणणारा अेक तोतया निघाला. त्याला ती असत्य भूमिका घेण्याच्या अपराधासाठी अुंटावर अुलटा बांधून मेखसूनं डोकं फोडून की हो मारलं! सत्ययुगात असत्याची अितकी चाड होती, पण आता आलं कलियुग! आता पहा! आपण सदाशिवरावभाअू आहोत म्हणून छातीवर हात मारून सांगणारे, पांच दहा तरी तोतये या महाराष्ट्रात आज रंगभूमीवर मिरवत असतात. पानपतचा मुकाबला! पानपतचा मोबदला टीचभर रंगमंचावर तीन लाख सेनेच्या हालचाली करवीत पानपतच्या लढाया लढत असतात. पण त्यांचं डोकं मेखसूनं फोडणं दूरच! पण अुलट चार चार रुपयांची तिकिटं काढून लोक टाळ्यांनी त्यांना सत्कारीत असतात. पेशवाअी बुडाली म्हणून बरं झालं, नाही तर, या भाअूच्या तोतयांतील अत्यंत धाडशी, तो शाहूनगरवासी गणपतराव जोशी पेशव्यांच्या गादीवर आपला अधिकार सांगून, पुण्यावर स्वारी देखील करता. आणि हे प्रेक्षक आपल्या हातातील छड्यांसच तलवारी समजून 'हर हर महादेव' करून त्याच्या सैन्यांत भरती होते.

**सूत्रधार–** सत्यप्रिय! वाचिक सत्य म्हणजे सत्य ही तुमची सत्याची व्याख्या मला संशयास्पद वाटते. समाजाला मंगलास्पद असणाऱ्या ध्येयाकडे प्रवृत्त करायला



नाट्यकला जर ती अुदात्ताशी समरस होअील तर... अेक अत्यंत अुपयुक्त साधन आहे, असं मला अजूनही वाटतं म्हणून तुम्ही मला क्षमा करा.

**सत्यप्रिय–** कसली क्षमा! अहो सूत्रधार! तुमच्या नांवापासून सगळी थापेबाजी! काय म्हणे सूत्रधार! अहो तुमच्या हातात सूत तरी धरीत जा तेवढा वेळ, म्हणजे तेवढं असत्याचरण टाळता येईल. तुम्ही बळाने काय वाटेल तें करा. पण मी तरी तुम्हांला सत्याच्या नांवानं नाटकाचा परवाना देत नाही.

**पार्श्वचर–** आम्हांला सरकारी परवाना मिळाला आहे. आता आम्ही सत्याच्या परवान्याला मुळीच भीक घालीत नाही, समजलांत!

**नटी–** पण प्राणनाथ, अभिनव कथानकाचा प्रयोग करण्यासाठी सज्ज होअून त्या पहा आल्याच मुली. मायापूर गावच्या महारवाड्यात त्यांनी स्वत: लाविलेल्या फुलवाडीत फुलं तोडायला येत आहेत, पहा! तर चला, त्यांचं रंगसाहित्य आपणांला तत्परतेनं केलंच पाहिजे. तर चला. (जातात.)

✦✦✦

## प्रवेश २ रा

(स्थळ – मायापूर महारवाडा. पात्रें चंपी सखू बोलत येतात.)

**सखू–** चंपे! खरंच, ही या कमलिनीची फुलवाडी कशी आता अेखाद्या नंदनवनासाखी शोभू लागली आहे. नाही? जेव्हा मोगरीला किंवा या प्राजक्ताला बहर येतो, तेव्हा या आपल्या सर्व महारवाड्यांत सुगंधाचा दरवळ अगदी मावेनासा होतो. या फुलवाडीच्या मध्यभागी आपले महारांचे नाअीक, जानबा महार यांनी त्यांच्या दोन मुलांसाठी– आपल्या किसन आणि कमलिनी, यांच्यासाठी – जें तुळशी वृंदावन बांधलें आहे. तिथं तर या सुगंधाच्या दरवळाच्या मांडवाखाली क्षणभर जरी अुभं राहिलं तरी मन त्या देवीच्या देवळापाशी नवरात्रांत अुभं राहिल्यासारखं प्रसन्न होतं, नाही? देवळाच्या गाभाऱ्यात असंच प्रसन्न पावित्र्य नांदत असेल नाही?

**चंपा–** तें मला कसं सांगता येणार? आपण महाराच्या मुली! देवीच्या देवळाच्या तटापर्यंत फारतर लोक आम्हांला जाअू देणार. तेव्हा त्या देवीच्या देवळाच्या गाभाऱ्यातलं प्रसन्न गांभीर्य कसं असतं, याची कल्पना तरी आम्हांला कशी

करता येणार? पण अितकं खरं की, आपल्या जानबा नाअिकांना संत चोखामेळ्याचा प्रसाद झाल्यापासून त्यांनी आपल्या या महारवाड्यात स्वच्छतेच्या आणि देवलसीपणाच्या अमृताचे सडे सकाळ संध्याकाळ शिंपून शिंपून, त्यांनी आपल्या महारवाड्याला अितकं शूचिर्भूत, शोभिवंत आणि मनोरम करून सोडलं आहे की, देवळातल्या गाभाऱ्यात मन कसं प्रसन्न होत असेल, याची थोडी तरी कल्पना आपणांला या तुळशीवृंदावनापाशीही अुभं राहून करिता यावी. कमलिनी तर जानबाची मुलगीच. त्यांचा अेकुलता अेक मुलगा किसन आणि मुलगी कमलिनी! दोघांना ग्रंथ वाचायला, अभंग म्हणायला सर्व त्यांनी स्वत: शिकवलं. त्याच्याच संगतीनं आपण सगळ्याजणी पण पोथी वाचू लागलो नाही का गं? कमलिनीला तर काय विचारावं, जानबांनी घासून पुसून एखाद्या देवीसारखी अुज्ज्वल करून ठेविली आहे. ही फुलवाडी, हें वृंदावन आणि त्यांची ही मनोहर प्रसन्नता म्हणजे, कमलिनीच्या शोभेची आणि भक्तीची खाली पडलेली अेक छायाच आहे.

**सखू–** मला किनअी, पहिल्या पहिल्यानं तिच्या सांगण्याचा कंटाळा येअी. नेहमी स्वच्छ रहा! अंग धू! लाव हें झाड! कर पाठ तो संस्कृत शब्द! वाच ही पोथी! असं तिनं सारखं म्हणावं. मी म्हणे, अगं, आपण महाराच्या मुली, आपण किती धुतलं आणि पुसलं, तरी ब्राह्मणांच्या मुली का शोभणार आहोत? तिनं म्हणावं, अगं हा प्रश्न शोभेचा नाही. आपणांला नायकिणी थोडंच व्हायचं आहे. आपण शोभावं कसं हा प्रश्न नसून, आपण राहावं कसं, व्हावं कसं, हा प्रश्न आहे. आता मला कोणी, नको म्हटलं तरी, शेतीभातीचं आणि नगरातलं मार्ग साफ झाडून येण्याचं काम संपताच, अंग धुअून पोथीच्या चार तरी ओळी वाचल्याविना जिवाला समाधान वाटतच नाही!

**चंपा–** जानुबाबांनी जेव्हा म्हटलं की, प्रत्येक महाराच्या अंगणात अेकेक वृंदावन पाहिजे, तेव्हा मी स्वत: माती खणून तें आपल्या दारासमोर बांधलं. या फुलवाडीला असं गोकुळासारखं मनोरम बनवायला कमलिनीला मी शक्य तें साह्य देत आलें बरं का?

**सखू–** हो तर! आणि आता या गोकुळाला, त्या गोकुळाची अगदी सर्वांशी समान प्रतिमा करण्यासाठी, कमलिनी या फुलवाडीत गोपींच्या लीलाही सुरू करणार आहे हो लवकरच! त्यालाही आपण साह्य द्या बरं, चंपाताअी? खरंच चंपे! तुला कळली का अेक गंमत?



**चंपा–** काय ग ती?

**सखू–** अगं, कमलिनीचं त्या शंकरशी जमलं आहे.

**चंपा–** जमलं, म्हणजे ग काय?

**सखू–** काय हो ही भोळी पोर! कळत नाही का ग तुला? अगं, जमलं म्हणजे हं–नाही, तसं नाही कळायचं तुला, अगं, जसं तुझं त्या कमळीच्या भावाशी– किसनशी जमलं ना तसंच कमळीचं शंकराशी जमलं हो. आता कसं कळलं? छडी लागे छम् छम्, विद्या येअी घम् घम्

**चंपा–** सखे, जर तुझ्या त्या जिभेची छडी अशीच निष्कारण लागत राहील मला तर तुझ्या संगतीची ही फटकळ शाळा सोडून लवकरच पळून जावं लागेल हो. जा, तू माझ्यापाशी अुभी राहू नकोस. मी तिकडचीं फुलं तोडतें आपली!

**सखू–** मी पण तिकडची तोडते.

**चंपा–** तर मग मी अिकडचीं तोडीन आपली.

**सखू–** अगं पण माझ्यावर रागवायला काय झालं? मी का तुझं किसनशी जमवलं? तुझेच आईबाप तसं कायसं ठरवताहेत नाही का? त्यांच्यावर रागाव आपली.

**चंपा–** सखे, खरच का? कायगं, पण कमळीला तिचे वडील शंकराला देणार?

**सखू–** वडील काय म्हणतात, तें काही मला माहीत नाही. पण कमळीच्या भावानं–तुमच्या भावी यजमानांनी–काल शंकरला तसं त्या फुलवाडीत सांगताना मी अैकलं आपलं उडत. शंकरचा आणि किसनचा लहानपणापासूनचा स्नेह, या नव्या बंधनानं अधिकच स्निग्ध होणार. आणि तुम्ही तर काय–कमलाबाई– तुमच्या वन्सं होणार नाही का आता?

**चंपा–** तें तू काय वाटेल तें म्हण. पण मी आपली कमलिनीला आणि तुला लहानपणाच्या प्रेमळ मैत्रिणी म्हणूनच ओळखणार.

**सखू–** अगं! आलीच ती कमळी! गंमत करू हो तिची जरा (कमलिनी प्रवेश करिते) कमळे! हीं पाहिलीस का मोगरीची मी किती फुलं तोडलीं तीं? चंपाची परडी मात्र रिकामीच्या रिकामी–नुसती गप्पा मारीत होती.

**चंपा–** नाही गं, कमलिनी, ती फुलं तोडीत होती तेव्हा मी या मोगरीला–मदनबाणाला पाणी घालीत होते, त्यांची आळी साफ करून त्यांच्या पानाला